सकाळ

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र घेणार सराव पेपर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे ३० एप्रिलला होणाऱ्या राज्य लोकसेवा आयोगाच्या ग्रुप बी आणि सी संयुक्त पूर्व परीक्षेच्या तीन सराव पेपर घेतले जाणार आहेत. हे सराव पेपर १३, १७ आणि १९ एप्रिलला सकाळी अकरा ते दुपारी बारा या वेळेत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये होणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी ६ ते १२ एप्रिलदरम्यान सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहा या वेळेत त्यांची नावे दूरध्वनी अथवा समक्ष केंद्रामध्ये येऊन नोंदवावीत. नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनाच सराव पेपर देता येतील, अशी माहिती या केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी दिली.

पुढारी

# न्यू कॉलेजमध्ये आज 'न्यू होरायझन टू के २३'

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजमधील कॉम्प्युटर सायन्स विभागातर्फे 'न्यू होरायझन टू के २३'चे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. ६ एप्रिल रोजी, न्यू कॉलेज येथे सकाळी १० ते ६ या वेळेत हा उपक्रम होणार आहे.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी आंतर महाविद्यालयीन पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन, प्रोग्रामिंग स्किल टेस्ट स्पर्धा, असे या उपक्रमाचे स्वरूप आहे. स्पर्धेतील विजेत्यांना अनुक्रमे २ हजार, दीड हजार व एक हजार रुपयांचे बक्षीस, स्मृतिचिन्ह व सर्टिफिकेट देण्यात येणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉक्टर अरुण पाटील यांच्या हस्ते आणि संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. ए. ए. कलगोंडा यांनी दिली.